



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com


वर्ष २ रे | अंक : ६४१. वा | गुरुवार | दि. ०४ जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# महाभ्रष्टाचारी टेकाळेंवर कारवाईसाठी महसूल विभागात अंतर्गत हालचाली

## आयुक्त कार्यालयातूनच कारवाईसाठी जोरदार प्रयत्न...

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात आता महसूल विभागात अंतर्गत हालचालींना वेग आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार थेट अमरावती महसूल आयुक्त कार्यालयातून टेकाळेंवर आता कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजवर अनिर्बंध भ्रष्टाचार करणाऱ्या टेकाळेंवर कारवाईची कुऱ्हाड कोसळणार यात काहीही शंका दिसून येत नाही. शासनाच्या महसूल विभागात कार्यरत राहून शासनालाच लाखो रुपयांचा चुना लावणे, प्रचंड नियमभंग करून कामकाज करणे, भ्रष्टाचाराचे सगळे विक्रम मोडणे, तलाठी कार्यालयात आलेल्या सर्वसामान्य नागरिकांची लुबाडणूक करणे, भ्रष्टाचाराच्या पैशातून स्वतःच्या तुंबड्या भरणे व त्यातून अमाप संपत्ती गोळा करणे, तसेच आपल्याच शासकीय सेवाशर्तींना हरताळ फासत वर्षानुवर्षे एकाच कार्यालयात व एकाच पदावर चिकटून राहणे, असे अनेक प्रताप मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी केलेले आहेत. अशा या परमप्रतापी (?) विजय टेकाळे यांची शासकीय सेवेतील कारकिर्द प्रचंड वादग्रस्त राहिलेली आहे. टेकाळे यांनी आपल्या सेवाकाळात जमीन महसूल कायद्याची वासलात लावणे, तुकडेबंदी कायद्याचा भंग करणे, स्वतःच रद्द केलेले फेरफार पुन्हा बेकायदेशीररित्या नियमित करणे, जमीन वाटणीत घोटाळे करून भलत्यात लोकांचा लाभ करून देणे, एखाद्या व्यक्तीचा सातबारा थेट दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाने करणे,विभागीय चौकशी सुरु असताना ही जमीन सम्राटांशी साटेलोटे करून त्यांच्या जमिनीचे बेकायदेशीर व्यवहार नियमित करून देणे, नुसत्या एका बॉण्ड पेपरवर जमीन वाटणीचे प्रकार करून शासनाच्या महसुलाला चुना लावणे आणि या सर्व घोटाळे व भ्रष्टाचारातून स्वतःची बेकायदेशीर अमाप संपत्ती जमवणे, असे भयंकर प्रकार केलेले आहेत. खरे तर कोठाळे यांच्या गुन्ह्यांची जंत्री एव्हढी मोठी आहे की, एव्हढे नियम व कायदे मोडणारा अधिकारी आज कारागृहात असावयास पाहिजे होता. परंतु विजय टेकाळे यांनी सातत्याने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राजकीय व संघटनेचा दबाव आणून तसेच त्यांना ब्लॅकमेल करून आपल्यावरील कारवाई वाचवली. विजय दत्तात्रय टेकाळे ही अशी एक भावनाशून्य आणि नीतिशून्य व्यक्ती आहे की, जिला स्वतः च्या पापांवर थोडाही अपराधबोध नाही. त्यांना भ्रष्टाचार करताना आणि हा भ्रष्टाचार दडपण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्यांचा वापर करण्याची थोडीही लाज-शरम वाटत नाही. पैशांना प्रचंड हपापलेले हे व्यक्तिमत्व कुठल्याही थराला जाऊन भ्रष्टाचार करणे व स्वतःला चावणे, हे प्रकार करू शकतो. विजय दत्तात्रय टेकाळे आज बुलढाणा महसूल विभागात भ्रष्टाचाराचे ब्रँड ॲम्बेसिटर बनले आहेत, परंतु शोकांतिका ही त्यापेक्षाही मोठी आहे. टेकाळे हे एकीकडे स्वतःच्याच अधिकाऱ्यांबद्दल अत्यंत अश्लाघ्य भाषेत बोलतात, तर दुसरीकडे त्याच अधिकाऱ्यांना अक्षरशः ब्लॅकमेल करून स्वतः ची चामडी वाचवण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांच्या विविध प्रकारच्या भ्रष्टाचारासंदर्भात त्यांच्यावर आजवर कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. महसूल विभागाचे अधिकारी आणि महसूल विभागाचे संपूर्ण प्रशासन हे टेकाळेंसमोर लाचार बनले असले, तरी निर्भिड पत्रकारिता व भ्रष्टाचारविरोधातील आपली कणखर भूमिका घेऊन काम करणारे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र अजिबात लाचार नाही.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने सर्वप्रथम टेकाळेंच्या भ्रष्टाचारा वाचा फोडली. टेकाळेंच्या काळ्या कारनाम्यांचा कच्चा-चिठ्ठा खुला केला. यानंतर महसूल प्रशासनात खळबळ उडाली. परंतु महसूल प्रशासन आज अत्यंत भेकड आणि नेभळट भूमिका घेऊन काम करीत आहे. टेकाळेंचे एव्हरेस्टच्या शिखराएव्हढे भ्रष्टाचार सूर्यप्रकाशात येऊन देखील महसूल विभाग आतापर्यंत शांत होते. परंतु दैनिक जनसंचलन व सिटी न्युजच्या लढ्याला आता यश येऊ लागले आहे. कर्तव्यदक्ष अमरावती महसूल आयुक्तांकडे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज ने टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराची माहिती पुराव्यांनिशी दाखल केली. यावर आता विद्यमान महसूल आयुक्तांनी कठोर भूमिका घेतल्याचे दिसत आहे. एक व्यक्ती महसूल विभागात राहून महसूल विभागाची प्रतिमा मलीन करतो, शासनाला चुना लावतो, भ्रष्टाचार करतो, नियमभंग करतो, आपल्याच अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवतो आणि भ्रष्टाचारातून प्रचंड संपत्ती गोळा करतो, या सर्वांची माहिती मिळाल्यानंतर महसूल आयुक्तांनी आता या प्रकरणी गांभीर्याने लक्ष घातल्याचे दिसत आहे. दैनिक जनसंचलन ला सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आता थेट महसूल आयुक्त कार्यालयातून टेकाळेंवर कारवाईसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. वरिष्ठ स्तरावरून या हालचाली असल्या कारणाने आता टेकाळेंच्या वाचण्याची शक्यता फारच कमी आहे. लवकरच यासंदर्भातील कारवाईचे आदेश बुलढाणा महसूल विभागात धडकणार आहेत. एकीकडे या सर्व हालचाली होत असताना दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज देखील भ्रष्टाचारविरोधातील भूमिका घेऊन कणखरपणे लढत आहे. त्यामुळेच सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने जोपर्यंत टेकाळे यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत सक्रियपणे या विषयात कार्यरत राहणारच. दुसरीकडे टेकाळे यांची अफाट बेकायदेशीर संपत्ती, त्यांचा भ्रष्टाचार, यावर कारवाईसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, आयकर विभाग यांच्याकडेही सातत्याने पाठपुरावा करीत राहणार आहेच.




> महसूल विभागातील त्या बड्या अधिकाऱ्याने नियमबाह्य केलेल्या कामांची संपूर्ण जंत्री पुराव्याणीशी कमिशनर साहेबांना सुपूर्त करण्यात आली असून बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे व तो बडा महसूल अधिकारी यांच्यावर कोणत्याही क्षणी कारवाई होण्याची दाट शक्यता असून जो पर्यंत या भ्रष्टयाचारयांवर कारवाई होत नाही आमचा हा लढा असाच कायम सुरू राहणार

# बुलडाणा लोकसभेच्या तयारीसाठी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे १३ जानेवारीला चिखलीत

**जनसंचलन/ चिखली**

आगामी एप्रिल - मे २०२४ महिन्यात लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक होत असून यासाठी सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. महाराष्ट्रात सत्ताधारी असलेले शिवसेनेचे नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील पक्षाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्यभर दौरे सुरू करत असून चिखली येथे दि. १३ जानेवारी २४ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे या निमित्त आगमन होत आहे. जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आल्याची माहिती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली आहे. लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी शिवसेना पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते व लोकप्रतिनिधींना चालना देण्यासाठी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चिखली येथे येत असून त्यांच्या उपस्थितीत पक्षाचे बूथ प्रमुख, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा तसेच जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने खा. प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दि. ३ जानेवारी रोजी चिखली येथे एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. दि. १३ जानेवारी २४ रोजी सायंकाळी पाच वाजता जिल्हा परिषद मैदानावर या सभेचे आयोजन केल्याची माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख शिवाजीराव देशमुख यांनी दिली आहे.



# काळा वाहन कायदा परत घ्या राष्ट्रपतींना शिवसेना उबाठा चा इशारा...

**जनसंचलन / लोणार**

केंद्राने नव्याने केलेला काळा वाहन कायदा परत घ्या नसता केंद्र शासनास सळो की पळो करून सोडूत असा इशाराच राष्ट्रपतींना तहसीलदार यांच्या मार्फत शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक प्रा.डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे)यांनी दिला.

केंद्र सरकारने राज्यघटनेतील वाहन कायदा बदलून काळा वाहन कायदा आणला आहे यामध्ये, एखाद्या चालकाच्या हाताने कळत नकळत अपघात घडला व त्याने अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला सोडून निघून गेला तर त्यास दहा वर्षाची कैद व दहा लाख रुपये दंड, त्यानंतर जर त्याने अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला मदत केली व त्यास दवाखान्यापर्यंत पोहोचवलं तर पाच लाखाचा दंड व पाच वर्षाची शिक्षा असा हा काळा कायदा केंद्र शासनाने केला आहे. या माध्यमाने चालकाचा वेगळा विमा उतरवून त्यास आर्थिक भुर्दंड देऊन आपल्या मित्रांच्या विमा कंपन्या बलाढ्य करण्याचा हा कट आहे चालक याच्या हातून नकळत कुठलाही अपघात घडला व तो त्या जखमी अपघातग्रस्ताला दवाखान्यात नेण्यासाठी थांबला तर त्या परिसरातील लोक त्या




ट्रक चालकाला मरेपर्यंत मारण्याचा प्रयत्न करतात व याची हजारो उदाहरणे आहेत, जमावाने ट्रक चालकाला ठेचून ठेचून मारले असे असताना सुद्धा केंद्र सरकार असा काळा कायदा जो कायदा इंग्रजांनी सुद्धा कधी केला नाही त्याहीपेक्षाही वाईट काळा कायदा हा केंद्र सरकारने आणला आहे. त्यामुळे जो चालक बिचारा महिना महिना, दोन दोन महिने, आपल्या परिवारापासून दूर राहून देशाची सेवा करतो सामान्य माणसापर्यंत गरजेच्या वस्तू पोहोचवतो त्या देशभक्त सैनिकाला तयार केलेल्या काळ्या वाहन कायद्यात अडकवणे हे अमानवीय आहे.

राज्यघटनेत वाहन कायदा आहे त्याच कायद्याला कायम ठेवावे व केंद्र शासनाने नव्याने आणलेला काळा वाहन कायदा हा रद्द बादल करावा किंवा परत घ्यावा अन्यथा संपूर्ण भारताची जीवन वाहिनी ही बंद होईल व याचा फटका सर्वसामान्य गोरगरिबाला बसेल केंद्र शासनाने आणलेला नवा काळा वाहन कायदा हा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व महाविकास आघाडी यांच्या माध्यमातून संपूर्ण देशभर तीव्र आंदोलन करून केंद्र शासनास सळोकी पळो करून सोडूत असा इशाराच शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ गोपाल बशिरे तालुकाप्रमुख एड दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव सर, यांनी तहसीलदार मार्फत राष्ट्रपतींना दिला याप्रसंगी ताजाजी अंभोरे, एकबाल कुरेशी, नंदकिशोर राठोड, परसराम राठोड, किरण कमडे, मच्छिंद्र अंभोरे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते

# शिवालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंती दिनी अभिवादन...

## भाजपा शहराध्यक्ष अनंता शिंदे यांनी केला बालिका दिन व महिला मुक्ती दिना निमित्त महिलांचा सन्मान...

**जनसंचलन/बुलढाणा**



दरवर्षीप्रमाणे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन ,महिला मुक्ती दिन अशा विशेषत्वाने साजरा करण्यात येतो. बुलढाणा येथे सुद्धा भाजपा लोकसभा प्रमुख मा. आमदार विजयराजजी शिंदे यांचे जनसंपर्क कार्यालय शिवालय बुलढाणा येथे आज दि. ३ जानेवारी २०२४ रोजी भारतीय जनता पार्टी बुलढाणा शहर च्या वतीने शहराध्यक्ष श्री अनंता शिंदे यांच्या नियोजनातुन बालिका दिन, महिला मुक्ती दिन उत्साहात साजरा करून आगळ्या वेगळ्या पद्धतीने सावित्रीमाईंना अभिवादन करण्यात आले. प्रसंगी उपस्थित असणाऱ्या सर्व महिलांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच बालिका दिना निमित्त कु. काव्या पवार व कु.आरुषी शिंदे यांचाही सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीचे सदस्य श्री दीपकदादा वारे, कामगार मोर्चा प्रदेश प्रतिनिधी श्री अण्णासाहेब पवार, कामगार मोर्चा प्रदेश सचिव श्री विश्रामजी पवार शहराध्यक्ष श्री.अनंता शिंदे ई मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. याशिवाय या प्रसंगी श्री संजय साखरे ,श्री राजेंद्र पवार,श्री प्रदीप तोटे,श्री प्रदीप सोनटक्के महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस सौ उषाताई पवार ,जिल्हा उपाध्यक्ष सौ अलका पाठक, महिला शहराध्यक्ष सौ वर्षाताई पाथरकर, राजमाता फाऊंडेशन च्या अध्यक्षा सौ योगिता शिंदे यांसह भाजपा पदाधिकारी ,कार्यकर्ते व महिला भगिनी यांची मोठ्या संख्येने विशेष उपस्थिती होती.

# दुचाकी चोर अडकले चिखली शहर पोलिसांच्या जाळ्यात...

**जनसंचलन/ चिखली**

रात्रीच्या सुमारास घरासमोर उभी असलेली दुचाकी चोरून नेणाऱ्या आरोपीचा शिताफीने छडा लावत त्यास चिखली पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान अटकेतील आरोपीची सखोल चौकशी केली असता त्याने तीन दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली असून पोलिसांनी या दुचाकीही ताब्यात घेतल्या आहेत. सुश्रुत रमेश सुरडकर (रा. बेराळा, ता. चिखली) असे अटक केलेल्या दुचाकी चोरट्याचे नाव आहे. त्याने बेराळा येथील गजानन पाटीलबा सुरडकर यांनी घरासमोर उभी केलेली दुचाकी (एमेच-२८-एडब्ल्यू २२६) १० डिसेंबरच्या रात्री चोरून नेली होती. याप्रकरणी गजानन सुरडकर यांनी चिखली पोलिसांत तक्रार दिली होती. ठाणेदार संग्राम पाटील यांनी त्याची गंभीर दखल घेत दुचाकी चोरांचा बंदोबस्त करण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण पथकास सूचना देऊन गुन्ह्याचा तपास सुरु केला, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पोलिस उपनिरीक्षक नितीनसिंह चौहाण, पोलिस अंमलदार अमोल गवई, राजेश मापारी, नीलेश सावळे,




प्रशांत धंदर, पंढरी मिसाळ, सागर कोल्हे, राहुल पायघन व रुपाली उगले यांनी सदर चोरी संदर्भाने गोपनीय व तांत्रिक माहितीचे आधारे सदर दुचाकी सुश्रुत रमेश सुरडकर याने चोरल्याचे समोर आले. त्याची चौकशी केली असता त्याने चिखलीसह बोराखेडी पोलिस स्टेशन हद्दीत देखील दुचाकींची चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीने चोरी केलेल्या एमएच- २८ एडब्ल्यू २२६, एमएच-२८-एडी-१५३२, एमएच-२८-एस ३१६६ या सुमारे ८५ हजार रुपये किंमतीच्या दुचाकीही हस्तगत केल्या. पुढील तपास पोलिस नायक कडुबा मुंढे व त्यांचे सहकारी करीत आहे.

मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस लि.पुणे

MITCON™
Solutions for Sustainable Tomorrow

मिटकॉन नेचर बेस्ड सोल्युशन्स लिमिटेड
महोगनी विश्व ॲग्रो लिमिटेड

कृषि-वानिकी : शाश्वत विचार!
देईल पर्यावरण संरक्षणासोबत आर्थिक समृध्दी!

MAHOGANI VISHWA AGRO
MITCON NATURE BASED SOLUTIONS



कृषि-वानिकी : १.भारत हा कृषिप्रधान देश आहे, उत्तम प्रकारची जमीन व हवामान अनुकूल असल्याने कृषि-वानिकीच्या माध्यमातून उत्तम लाकूड निर्मिती हे संस्थेचे ध्येय आहे.

महोगनी लागवडीचे नियोजन: १.पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन असावी.
रोपांची लागवड पध्दती :- • एक एकर क्षेत्रासाठी ४४४ रोपे लागतील.
• लागवडीचे अंतर १०x१० फूट किंवा ८x१२ फूट असावे.
• सरासरी खड्ड्यांची लांबी, रुंदी व खोली १.५ x १.५ x १.५ फुटाची असावी.

भारतात लाकूड उद्योगातील संधी: १. निर्यातक्षम लाकूड निर्मिती करून ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मीती करणे.

मिटकॉनद्वारे शेतकऱ्यांना मिळणार कार्बन क्रेडिट
महोगनी कृषि-वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पत्रकारांसह कुटुंबीयांची होणार संपूर्ण आरोग्य तपासणी...

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने बुलढाण्यात आयोजन

जनसंचलन / बुलढाणा

पत्रकारांची देशातील सर्वात मोठी संघटना असलेल्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने गुरुवार, ४ जानेवारी २०२४ रोजी पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यासाठी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. पत्रकार भवन येथे सकाळी नऊ वाजता या शिबिराला सुरुवात होईल. तज्ञ डॉक्टर पत्रकारांसह त्यांच्या परिवारातील सदस्यांची तपासणी करणार आहेत. या शिबिरासाठी उपाशीपोटी (चहा, नाश्ता न करता) उपस्थित राहणे आवश्यक आहे. सर्व पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपले आरोग्य निरोगी ठेवावे, असे आवाहन व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिरानंतरही उपचाराची ज्यांना गरज असेल, त्यांना पुढील सूचना दिल्या जातील, अशी माहिती जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत बगाडे, कार्याध्यक्ष कृष्णा सपकाळ, सरचिटणीस गजानन धांडे व शहराध्यक्ष गणेश निकम यांनी दिल्याचे प्रसिद्धीप्रमुख संदीप वंत्रोले यांनी सांगितले. व्हॉईस ऑफ मीडिया ही पत्रकार व पत्रकारितेच्या प्रश्नावर काम करणारी संघटना आहे. बुलढाणा शहरातील सर्व पत्रकारांनी कुटुंबासह आरोग्य तपासणीला उपाशीपोटी उपस्थित राहावे, असे आवाहन व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी केले आहे.

VOICE OF MEDIA

आरोग्य तपासणी झाल्यानंतर लगेच त्याचठिकाणी पत्रकार भवन येथे सकाळी ११ वाजता शहरातील ज्येष्ठ पत्रकार व यशश्री मिळवणाऱ्या पत्रकारांचे पाल्य, सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सत्कारदेखील व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने करण्यात येणार आहे.

# ट्रॅक्टर मोर्चा प्रकरणी सुमारे १५० शेतकऱ्यांवर झाले गुन्हे दाखल

## उपोषणाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे काढला होता मोर्चा...

जनसंचलन / खामगाव

खामगाव तालुक्यातही बोरी अडगाव येथील शेतकऱ्यांनी विविध मागण्यांसाठी ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण सुरू केले होते. मात्र याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे बोरी अडगाव येथील शेतकऱ्यांनी १ जानेवारी रोजी खामगावात ट्रॅक्टर मोर्चा आणला होता. सदर मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर पोहोचण्यापूर्वीच पोलिसांनी हा मोर्चा अडविला. त्यामुळे शेतकरी व पोलिसांमध्ये तणाव निर्माण झाला होता. यावेळी शेतकऱ्यांनी रस्त्यावरच ठिय्या दिला व अर्धनग्न आंदोलन सुरू केले होते. तसेच सरकार व पोलिसांबाबत घोषणाबाजी केली. या प्रकरणी शहर पोलिसांनी आता सुमारे १५० शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. शिवाजीराव उर्फ रावसाहेब टीकार पाटील व त्यांची पत्नी, संदीप शिवाजीराव टीकार पाटील, बंडू शिवाजीराव टीकार पाटील, बाळू खरात, मारोती तायडे, आनंद सुरवाडे, गणेश ठाकरे, ज्ञानेश्वर टीकार, हिम्मत सुरवाडे व शाम अवथळे सुमारे १५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या मोर्चाला वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदिप शेळके यांनी पाठिंबा देत सहभाग घेतला.बळाचा वापर करुन शेतकऱ्यांचा आवाज दाबता येणार नाही शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे.शेतकरी जगला पाहिजे याकरिता शासनाने त्यांना पाठबळ द्यावे.शेतकऱ्यांच्या मागण्या रास्त असुन त्या मान्य झाल्याच पाहिजे अशी भूमिका संदिप शेळके यांनी मांडली होती.

# मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांबाबत आक्षेप, हरकती आमंत्रित...

जनसंचलन/बुलडाणा

कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने सहकारी संस्थांच्या नोंदणीसाठी सुधारीत निकष लागू केले असून, त्यानुसार संग्रामपूर तालुक्यातील चोंढी तलाव हा लघुपाटबंधारे विभागाकडून मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरीत केला आहे. त्यामुळे प्राप्त संस्था नोंदणीच्या अनुषंगाने नाव राखून ठेवणे व बँकेत खाते उघडण्याचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संग्रामपूर तालुक्यातील चोंढी येथील नियोजित मोईन आणि जयभवानी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थासाठी मच्छीमारांना समान संधी मिळावी, या हेतूने १५ दिवसाची जाहिर नोटीस देवून आक्षेप व हरकती मागविण्यात येत आहेत. प्राप्त हरकतीवर संबंधिताचे म्हणणे ऐकल्यानंतर त्यांच्या अभिप्रायासह हे प्रस्ताव सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां) यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात येतील. मुदतीनंतर प्राप्त हरकतीवर कोणताही विचार केला जाणार नाही, असे सहायक निबंधक अ. वि. भोयर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# संजय कृषी सेवा केंद्र येथे दिनदर्शिकेचे लोकार्पण सोहळा...

जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील धोत्रा भनगोजी येथील संजय कृषी सेवा केंद्र येथे आज ३ जानेवारी २०२४ रोजी संजय सीड्सचे संचालक तथा सामाजिक कार्यकर्ते श्रीकृष्ण हरिभाऊ इंगळे, दगडू तुकाराम यादव एशिया मंच न्यूज चे (जि. प्र.) यांच्याहस्ते दिनदर्शिकेचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाला नितीन इंगळे, संजय इंगळे, वसंता बावस्कर, गजानन धनवटे, शिवराज इंगळे, अमोल निकम, डॉक्टर नरवाडे, संजय निकम,



संजय देशमुख, यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# जिल्ह्यातील आशा व गटप्रवर्तकांचा ऑनलाईन कामावर बहिष्कार...!

## जाहीर केलेली मानधन वाढीचा शासन निर्णय न काढल्यास १२ जानेवारीपासून बेमुदत संपाचा इशारा...

जनसंचलन /बुलडाणा

जिल्ह्यातील आशा व गट प्रवर्तक आणि शुक्रवारपासून ऑनलाईन कामावर बहिष्कार टाकला असून या आंदोलनाची दखल न घेतल्यास १२ जानेवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा बुलढाणा जिल्हा आशा व गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबतचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा राष्ट्रीय आरोग्य अभियान समन्वयक यांना देण्यात आले आहे.





दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, जिल्ह्यातील १८ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर या २३ दिवसाच्या कालावधीत महाराष्ट्रातील आशा व गटप्रवर्तकांनी प्रदीर्घ संप केला होता. यावेळी संपाच्या वाटाघाटीत दरम्यान आरोग्यमंत्र्यांनी अशांना ७ हजार व गटप्रवर्तकांना १० हजार रुपये मानधनात वाढ करण्याचे जाहीर केले होते, तसेच दरवर्षी २ हजार रुपये दिवाळी भेट सुद्धा देण्याचे मान्य केले होते. आता संप स्थगीत करून दीड महिना झाला तरी सुद्धा अद्याप त्याचा शासन निर्णय काढलेला नाही परंतु त्यांना मोबदल्यात शासनाने भरघोस वाढ केली आहे असे म्हणून त्यांना दिवस रात्र साधनसामग्री नसताना प्रचंड ऑनलाइन काम करायला आरोग्य प्रशासन भाग पाडत आहेत. त्यामुळे कृती समितीच्या आणि राज्य फेडरेशनच्या आदेशानुसार बुलढाणा जिल्हा आशा व गटप्रवर्तक संघटनेने २९ डिसेंबर पासून ऑनलाईनच्या सर्व कामावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आशा व गटप्रवर्तकांनी कोणतेही ऑनलाईन काम करू नये असे आवाहन संघटनेच्या वतीने जिल्हा अध्यक्ष पंजाबराव गायकवाड यांनी आपल्या आशा व गटप्रवर्तकांना केले आहे.

शासनाने १२ जानेवारीपर्यंत मानधन वाढीचा शासन निर्णय काढावा अन्यथा १२ जानेवारीपासून आशा व गटप्रवर्तक या पुन्हा एकदा संपावर जातील असे निवेदन राज्य शासनाला कृती समितीच्या वतीने देण्यात आले आहे. बुलडाणा जिल्ह्यात सुद्धा लोणार, सि.राजा, दे.राजा, मेहकर, शेगाव, मलकापूर, मोताळा इत्यादी तालुक्यातील आशा व गटप्रवर्तकांनी आज संपाची नोटीस आप आपल्या तालुका आरोग्य अधिकारी यांना दिली.

बुलडाणा येथे संघटनेचे जिल्हाध्यक्ष कॉ.पंजाबराव गायकवाड, जिल्हा सचिव सुरेखा पवार, राज्य कौन्सिल मेंबर जयश्री तायडे, कविता चव्हाण, विजया ठाकरे, दिपाली वळसे, प्रज्ञा तायडे, जया कल्याणकर इत्यादी सह मोठ्या संख्येने आशा व गटप्रवर्तक उपस्थित होत्या.

# विधवा परिचय मेळाव्यात फुलले दोन जीवांचे संसार...

## शिक्षणामुळे महिला आत्मनिर्भर बनू शकतात- आ. श्वेताताई महाले





### महिलांनो बंधनात अडकू नका- एएसपी महामुनी

पारंपारिक बंधने यात महिला अडकून पडतात. अशा बंधनात अडकू नका, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांना मुक्तीचा मार्ग दिला आहे. त्यामुळे स्वतःला एकटे समजू नका, प्रशासन आपल्या सोबत असल्याची हमी ए एस पी महामुनी यांनी दिली. यावेळी महामुनी यांनी विधवा विवाहासाठी झालेल्या प्रयत्नांची माहिती दिली. चिखलीत झालेला विधवा मेळा-वा ही खरी सावित्रीबाई फुले जयंती असल्याचे त्यांनी सांगितले.

**जनसंचलन/चिखली**

मुलींना शिक्षित केले पाहिजे, शिक्षणाने महिला आत्मनिर्भर होऊ शकतात. कोणत्याही अडीअडचणी आल्या तर त्याला सामोरे जाण्यासाठी शिक्षण हाच उपाय आहे. असे प्रतिपादन आ. श्वेताताई महाले यांनी केले. सावित्रीबाई फुले जयंतीच्या औचित्यावर जिजाऊ इंग्लिश स्कूल चिखली येथे आज विधवा परिचय मेळावा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. श्वेता महाले होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक बी बी महामुनी, विधवा विवाहाचे संकल्प डी एस लहाने, आयोजक पंडितराव देशमुख, प्रा. नरेंद्र खेडेकर, मनोज दांडगे ,डॉ. सत्येंद्र भुसारी, डॉ. वसंतराव चिं-चोले, प्रा. विष्णूपंत पाटील, प्रा. शाहीनाताई पठाण ,पत्रकार गणेश निकम, सलीम मेमन, सुधीर चेके पाटील, सुरेश साबळे,प्रमोद झिंजार्डे, डॉ. प्रकाश शिंगणे, दीपक मस्के, अश्विनी सोनवणे, प्रतिभा भुतेकर,स्वाती साबळे आदी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांनी सावित्रीबाई फुले व महापुरुषांचे पूजन केले. पुढे बोलताना आ. श्वेताताई म्हणाल्या -विधवा महिलांच्या समस्यावर आता चर्चा होत आहे, ही समाधानाची बाब आहे. बुलढाणातून यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी प्रा. डी एस लहाने यांचे कौतुक केले. ही भूमी बदल घडवणारी आहे. महात्मा फुले ,सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. शिक्षण हेच त्यांच्या समस्यावर उत्तर आहे. असे सांगून त्यांनी वाढती व्यसनाधीनता व कौटुंबिक अडचणी यावर भाष्य केले. प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक पंडितराव देशमुख यांनी केले. यावेळी त्यांनी आयोजनामागची भूमिका मांडली. प्रसंगी प्रा. नरेंद्र खेडेकर यांनीही विचार मांडले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रमोद झिंजर्डे यांना सामाजिक कृतज्ञात पुरस्कार प्रदान करण्यात आला. संचलन डॉ. भुसारी यांनी केले.

### खंबीर व्हा, लढा द्या-डी एस लहाने...

विधवा महिलांनो खंबीर व्हा व आपल्या हक्कासाठी संघर्ष करा, जोडीदार शोधणे हा प्रत्येकाचा हक्क आहे. यात सामाजिक मानसिकता हा मोठा अडसर असला तरी आपला निर्णय खंबीरपणे घ्या असे आवाहन विधवा विवाहाचे संकल्पक प्रा. डी एस लहाने यांनी केले. परिचय मेळाव्यात आलेल्या दोन विधवा व विधुर जोडप्याने लग्नगाठ बांधण्याचा निर्णय घेतला. यावेळी प्राध्यापक डीएस लहाने यांनी स्टेजवर त्यांचा साखरपुडा देखील उरकला.विधवा मेळाव्याचे हे फलित मानले जाते. प्रसंगी १५० पुरष तर ९९ विधवा महिलांनी विवाहासाठी नोंदणी केली.

# बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ पदाधिकाऱ्यांची होणार निवडणूक !

## सदस्य नोंदणीला झाली जिल्हाभर सुरुवात १५ जानेवारीपर्यंत होणार सदस्य नोंदणी..

**जनसंचलन/बुलढाणा**

८६ वर्षाचा प्रदीर्घ संघटनात्मक इतिहास असलेली, तमाम मराठी पत्रकारांची मातृसंस्था मराठी पत्रकार परिषद मुंबईशी सलग्न बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ, लोकशाही पद्धतीने चालणारी पत्रकारांची एकमेव संघटना असून.. प्रत्येक जिल्हा कार्यकारिणीचा कार्यकाळ दोन वर्षाचा ठरलेला आहे. त्यानुसार विद्यमान जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे, नव्याने जिल्हाध्यक्ष तथा कार्याध्यक्ष व सरचिटणीस निवडण्यासाठी निवडणूक होणार आहे. त्यासाठीच आज बुधवार ३ जानेवारी रोजी जिल्हाभर सदस्य नोंदणीला सुरुवात झाली असून, ही सदस्य नोंदणी येत्या १५ जानेवारीपर्यंत चालणार आहे. त्यानंतर मराठी पत्रकार परिषदेच्या निवडणूक विभागाच्या निर्दे शाप्रमाणे निवडणूक कार्यक्रम लावून तात्काळ निवडणूका घेण्यात येतील. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाची महत्त्वपूर्ण बैठक आज बुधवार ३ जानेवारी रोजी मध्ये जिल्हा पत्रकार भवनाच्या सभागृहात पार पडली. सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. नंतर नवीन अध्यक्ष, कार्याध्यक्ष व सरचिटणीस निवडीबाबत चर्चा करण्यात आली. उपस्थित पत्रकारांनी त्यांचे विचार अतिशय परखडपणे मांडून या जिल्हा पत्रकार संघात प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे, हे दाखवून दिले. यावेळी सर्वानुमते निवडणुकीद्वारे पदाधिकारी निवडण्याच्या ठरावाला समर्थन दिले. त्यानुसार तात्काळ जिल्हा पत्रकार संघाचे सदस्य नोंदणीला सुरुवात करण्यात आली. ३ ते १५ जानेवारी पर्यंत जे सदस्य नोंदणीची पावती फाडतील, त्या सर्वांना या निवडणुकीत सहभागी करून घेतल्या जाईल. जिल्हा पत्रकार संघाचा सदस्य त्यांनाच बनवले जाईल, की जे पत्रकार किंवा ज्या संघटना मराठी पत्रकार परिषदेच्या बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाशी सलग्न आहेत. इतर कोणत्याही संघटनेच्या पदाधिकारी किंवा सदस्याला जिल्हा पत्रकार संघात सदस्य होता येणार नाही. सदस्य नोंदणी झाल्यानंतर अंतिम यादी २० जानेवारीपर्यंत घोषित करण्यात येईल व तात्काळ मराठी पत्रकार परिषदेचा निवडणूक विभागातर्फे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात येईल. निवडणुका या अध्यक्ष, कार्याध्यक्ष व सरचिटणीस पदासाठीच होतील, नंतर पुढचे पदाधिकारी हे निवडून आलेले मुख्य पदाधिकारी नियुक्त करतील.. तोपर्यंत चंद्रकांत बर्दे व त्यांची कार्यकारणी जिल्हा पत्रकार संघाचे काम सांभाळेल.. असे यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव अमर राऊत यांनी सांगितले. यावेळी बुलढाणा शहर व जिल्हाभरातून बहुसंख्य पत्रकार प्रामुख्याने उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या अमरावती विभागीय अधिस्वीकृती समितीच्या सदस्यपदी राजेंद्र काळे यांची नियुक्ती झाल्यामुळे त्यांचा अभिनंदन करणारा ठराव बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या या बैठकीत, राजेश डिडोळकर यांनी मांडताच सर्वच उपस्थित पत्रकारांनी टाळ्यांच्या गजरात तो संमत केला. यानंतर सर्वांनी काळे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# जीवे मारण्याची धमकी देत एकाला केली मारहाण...

**जनसंचलन/ नांदुरा**



तालुक्यातील टाकळी वतपाळ येथे एकाला त्याच्या घरासमोर येत शिवीगाळ करून मारहाण करत जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तक्रारीवरून नांदुरा पोलिसांनी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत विनोद रामधन वसतकार (४१) रा. टाकळी वतपाळ यांनी पोलिसात तक्रार दिली. त्यामध्ये प्रमोद रामेश्वर वसतकार, शंकर रामेश्वर वसतकार, शंकर वसतकारचा मामा (नाव माहीत नाही), गणेश सुपडा वसतकार हे हातात लोखंडी रॉड व लाकडी काठी घेऊन घरासमोर आले. तेथे शिवीगाळ करू लागले. त्यांना हटकले असता गणेश सुपडा वसतकार याने लोखंडी रॉड मारून जखमी केले. तसेच इतर उपस्थित आरोपींनी लाकडी काठ्यांनी मारहाण करून जखमी केले. प्रमोद रामेश्वर वसतकार, शंकर रामेश्वर वसतकार यांनी शिवीगाळ करून जीवाने मारण्याची धमकी दिल्याचे म्हटले आहे. तक्रारीवरुन नांदुरा पोलिसांनी प्रमोद रामेश्वर वसतकार, शंकर रामेश्वर वसतकार, शंकर वसतकारचा मामा (नाव माहीत नाही), गणेश सुपडा बसतकार सर्व रा. टाकळी वतपाळ यांच्याविरुद्ध भादंविच्या कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ नुसार गुन्हा दाखल केला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याला वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड
प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

| 8x8 cm | 5x8 cm | 5x8 cm |
|---|---|---|
| 1 Month=5000/- | 1 Month=3500/- | 1 Month=3500/- |
| 15 Day=3500/- | 15 Day=2200/- | 15 Day=2200/- |
| 7 Day=2000/- | 7 Day=1500/- | 7 Day=1500/- |
| Hight 8 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 8 cm | Hight 5 cm, Width 23 cm |

एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

| 2600/- | 1800/- | 1300/- |
|---|---|---|
| Hight 12 cm, Width 12 cm | Hight 8 cm, Width 10 cm | Hight 8 cm, Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना– आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्कः

अजय राजगुरे–9922359674
ऑफिस नं.–9129582958
पत्ता– शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com